N.T (34) (39)

IMP Adhyadesh

# मुंबई विद्यापीठ

क्र.विके./ ५०० / २००३

दिनांक -२८ ऑक्टोबर, २००३

परिपत्रक :

संचालक/विविध विभाग प्रमुख, मुंबई विद्यापीठ, प्राचार्य सर. ज.जी. वास्तुशास्त्र महाविद्यालय, प्राचार्य /संचालक मान्यता प्राप्त पदव्यूत्तर संस्था आणि प्राचार्य कला, वाणिज्य, विज्ञान विधी अभियांत्रिकी, औषधनिर्माण शास्त्र व वास्तुशास्त्र महाविद्यालये/संस्था तसेच उपकुलसचिव आस्थापना विभाग, उपकुलसचिव शिक्षक नियुक्ती विभाग व उपकुलसचिव संलग्नता घटक महाविद्यालये विभाग यांना माहिती व योग्यत्या कार्यवाहीसाठी रवाना.

अ.म.मुरुडकर

[डॉ. अ. म. मुरूडकर]

कुलसचिव.

---

"भंगी" "रुखी" किंवा "बाल्मिकी" या जातींना प्रमाणपत्र देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय सांस्कृतिक कार्य क्रिडा व विशेष सहाय्य विभाग

शासन परिपत्रक क्रमांक - सीबीसी १०९५/१२१३१०/२२०/प्र.क्र.५२१/मावक-५

मंत्रालय विस्तार भवन मुंबई ४०० ०३२.

दिनांक - १६ एप्रिल २००३.

वाचा - १] शासन परिपत्रक समाजकल्याण सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग क्र. एसबीसी १०९५/१२३१०/२२०/प्र.क्र.५२१/मावक-२ दि. ९ दिनांक ९ नोव्हेंबर, २०००.

२] अध्यक्ष मुंबई प्रदेश हरिजन भंगी युवक सेवा समाज यांचे दिनांक २८.८.२००२ चे पत्र.

प रि प त्र क

वर उल्लेखिलेल्या अ.क्र.१ येथील शासन परिपत्रक दि.९ नोव्हेंबर, २००० अन्वये खालीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात आलेल्या होत्या.

१. शासनाचे प्रशासकीय विभाग [मंडळे महामंडळे प्राधिकरणासह]आणि शाळा/महाविद्यालये [सरकारी व बिगर सरकारी [खाजगी] विद्यापीठे व इतर संस्था याठिकाणी दप्तरातील अभिलेख्यात ज्याठिकाणी "भंगी" या शब्दप्रयोग करण्यात आले आहे त्याठिकाणी यापुढे "रुखी" किंवा "बाल्मिकी" असा शब्दप्रयोग करावा.

२. वरील सुधारणा [बदल] हा ग्रामपंचायत व इतर महसूली अभिलेख्यातदेखील करावा.

[कृ.मा.प.]

३. मागासवर्गीय वस्ती असलेला जो भाग [शहराचा/गावाचा/रस्ता विभाग] "भंगीवाडा" म्हणून ओळखला जातो/ संबोधला जातो त्या भागास "रुखीवाडा" किंवा "बाल्मिकीवाडा" म्हणून ओळखले जाते/संबोधले जाते.

२. वर नमूद केलेले परिपत्रक "रुखी" किंवा "बाल्मिकी" या शब्दाचा शब्दप्रयोग दैनंदिन व्यवहार व्यावहारिक देवाणघेवाण व प्रचलित पत्रव्यवहारात व्हावा या उद्देशाने काढण्यात आले आहे. परंतु याचा कोणताही विपरित परिणाम संविधानात उल्लेखिलेल्या शब्द किंवा तत्सम शब्द सफाई कामगार बंधूसाठी केलेल्या कायदेशीर तरतूदीवर आणि त्यानुसार त्यांना मिळत असलेल्या फायद्यावर होणार नाही.

३. अनुसूचित जातीच्या यादीमध्ये अ.क्र.१२ वर "भंगी" या जातीचा समावेश आहे व त्या जातीची तत्सम जात म्हणून "रुखी" व "बाल्मिकी" या जातीचा समावेश केलेला आहे. "भंगी" ऐवजी "रुखी" व "बाल्मिकी" असा उल्लेख करण्याबाबतच्या सुचना या विभागाच्या संदर्भाधिन अ.क्र.१ येथील परिपत्रकान्वये सर्व संबंधितांना देण्यात आलेल्या आहेत. त्यास अनुसरून शासन आता असे आदेश देत आहे की "भंगी" "रुखी" व "बाल्मिकी" या तीनही जाती अनुसूचित जाती म्हणून अधिसूचित केलेल्या असल्यामुळे अर्जदार ज्या जातीबद्दलचे आवश्यक ते पुरावे समक्ष प्राधिकाऱ्याकडे सादर करीत असतील व ज्यांना "रुखी" किंवा "बाल्मिकी" जातीचे प्रमाणपत्र हवे असेल त्यांना तसे प्रमाणपत्र दिले जावे व ज्यांना "भंगी" जातीचे प्रमाणपत्र हवे असेल त्यांना "भंगी" जातीचे प्रमाणपत्र देण्यात यावे.

४. सर्व मंत्रालयीन विभागांनी सदर आदेश त्यांच्या आधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांच्या निदर्शनास आणून याबाबत तात्काळ अंमलबजावणी करण्याबाबत कळविण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

[वै. अ. पारकर]
उपसचिव महाराष्ट्र शासन.